# महाराष्ट्र शासन
## शासकीय होमिओपॅथीक महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव.
**शासकीय महिला रुग्णालय, मोहाडी रोड, जळगांव ४२५००२**

ईमेल-ghmcjalgaon@gmail.com **www.ghmcjalgaon.in**


जा.क्र.शाआहोज/आस्था/ जाहिरात/ २५२ /२०२३ दिनांक – २८.०४.२०२३

**शासकीय होमिओपॅथीक महाविदयालय,जळगाव येथील अध्यापकीय पदे कंत्राटी पध्दतीने भरणेबाबत**

संदर्भ :- शासन निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग दिनांक ०७ सप्टेंबर २०११, दिनांक ०९ मे २०२२, दि.०७ सप्टेबर २०२२ व दि.२५/०४/२०२३

उपरोक्त संदर्भित दि.९ मे २०२२ च्या शासन निर्णयान्वये शासकीय होमिओपॅथी महाविदयालयाची पदे मंजुर करण्यात आलेली असून सदंर्भित शासन निर्णय दि. ०७ सप्टेंबर २०२२ अन्वये सदर महाविदयालयातील अध्यापकीय पदे ११ महिण्याच्या कालावधीसाठी कंत्राटी मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यासाठी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार या महाविदयालयातील मंजुर असलेली अध्यापकीय रिक्त पदे भरण्यात आलेली आहेत. आता शासन निर्णय दि.२५/०४/२०२२ अन्वये सदर पदामध्ये सुधारणा करण्यात आली असुन त्यानुसार बी एच एम एस प्रथम वर्षासाठी दोन सहायक प्राध्यापकाची पदे नव्याने मंजुर केलेली आहे.

या महाविदयालयातील शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये बी एच एम एस प्रथम वर्षामध्ये विदयार्थी प्रवेशित झालेले आहेत. यास्तव उपरोक्त शासन निर्णयान्वये नव्याने मंजुर करण्यात आलेल्या खालील रिक्त पदावर ११ महिन्याचे कालावधीसाठी करार पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात नेमणुक करण्यासाठी विहित अटी व शर्तीची पुर्तता करणा-या पात्र व इच्छुक उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती (walk in interview) दिनांक ०८ मे २०२३ रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात येत आहे.

तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने भरावयाच्या पदांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| पदनाम | पदसंख्या |
|---|---|
| १. सहायक प्राध्यापक, ऑरगन ऑफ मेडिसीन | ०१ |
| २. सहायक प्राध्यापक, मटेरिया मेडिका | ०१ |

| | | |
|---|---|---|
| **Essential Educational Qualification** | **Post** | **Assistant Professor** |
| | **Age** | Maximum age limit 65 years |
| | **Essential Educational Qualification** | Post Graduate qualification in Homoeopathy. The qualification shall be the one included in second schedule of Homeopathy Central council act 1973.<br>Preference shall be given to those candidates who holds experience of working as RMO and/or house physicians in a Homeopathic hospital attached a Homeopathic medical college permitted by central council/Central government<br>Or<br>Post Graduate Medical degree in concerned subject recognized by the Medical Council of India. Preference shall be given to those candidates who holds experience of working as RMO and/or house physicians in a Hospital attached to a medical college permitted by Medical council/Central government |
| | **Experience** | Preference shall be given to those candidates who holds experience of working as RMO and/or house physicians in a Hospital attached to a medical college permitted by Medical council/Central government |

| इतर अटी | |
|---|---|
| १. | करार पध्दतीने करावयाच्या नियुक्तीचा कालावधी हा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडुन किंवा आस्थापना मंडळाकडुन वा बदलीने तसेच अन्य प्रशासनिक कारणास्तव पात्र उमेदवार उपलब्ध होईपर्यन्त अथवा ११ महिन्याच्या कालावधीकरीता या पैकी जे अगोदर घडेल तो कालावधी राहील. मात्र कोणत्याही परिस्थितीत ११ महिन्याच्या कालावधीनंतर खंड दिल्याशिवाय पुनः करार पध्दतीने नियुक्ती दिली जाणार नाही. सदर पदावर नियमित उमेदवारांची नियुक्ती झाल्यास त्या तारखेस किंवा ११ महिन्याच्या कालावधी यापैकी जे अगोदर घडेल त्यावेळी त्यांची कंत्राटी स्वरुपाची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. |
| २. | करार पध्दतीने नियुक्त केल्या जाणा-या सहायक प्राध्यापक यांना शासन निर्णय दि. ०७.०९.२०२२ नुसार रु. ७०,०००/- मानधन देय राहिल. |
| ३. | महाविद्यालयाचे अधिष्ठाता यांचे नियंत्रणाखाली व निर्देशानुसार सदर पदाची कर्तव्ये व जबाबदा-या पार पाडाव्या लागतील. |
| ४. | नियुक्तीसाठी बाहयशक्तीचा दबाव अथवा शिफारस आणणारे उमेदवार नियुक्तीसाठी आपोआप अपात्र ठरतील. |
| ५ | करार पध्दतीवरील नियुक्त उमेदवारास राजिनामा द्यावयाचा झाल्यास त्यांनी (०३) महीन्याची आगाऊ नोटीस अधिष्ठातांकडे देणे बंधनकारक राहील. ते शक्य नसल्यास (०३) महिन्याच्या मानधनाची रक्कम शासकीय कोषागारात जमा केल्यानंतरच त्याचा/तिचा राजीनामा मंजुर करण्यात येईल. |
| ६. | करार पध्दतीवरील नियुक्ती केलेल्या अध्यापकांच्या कामकाजाचा आढावा अधिष्ठाता यांचेकडून नियमीतपणे घेण्यात येईल. असा आढावा असमाधानकारक असल्यास संबधीत उमेदवारांच्या नियुक्त्या पुर्वसुचना न देता समाप्त करण्याचे अधिकार अधिष्ठांताकडे राहतील. |
| ७. | करार पध्दतीवरील नियुक्त वैद्यकीय अधिकारी यांना रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदा-यावर विपरीत परीणाम होणार नाही याची दक्षता घेवुन खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्यास मुभा राहील. |
| ८. | करार पध्दतीवरील नियुक्त वैद्यकीय अधिकारी यांना नियमीत नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही व न्यायालयातही करार पध्दतीची नियुक्ती कायम करण्याबाबतचा दावा करता येणार नाही. तसेच करार पध्दतीवरील काम केलेला कालावधी सेवानिवृत्तीच्या लाभासाठी विचारांत घेता येणार नाही. |
| ९. | नियुक्ती आदेश मिळाल्यापासुन (७) दिवसाच्या आंत नियुक्तीच्या ठिकाणी रुजु न झाल्यास नियुक्तीवरील दावा आपोआप संपुष्टात येईल. |
| १०. | कार्यालयीन वेळेत खाजगी व्यवसाय करता येणार नाही. तसे आढळल्यास त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल. |
| ११. | शासन निर्णयातील अटी व शर्तीचे पालन करणेसंबधीची तसेच कायम नियुक्तीसाठी न्यायालयात दावा दाखल न करणेसंबधीचे बंधपत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच शासन/सक्षम प्राधिकरण/कार्यालयाकडुन वेळोवेळी प्राप्त निर्देश/आदेशाचे पालन करणे संबंधितास बंधनकारक राहील. |
| १२. | नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर फेरबदल करण्याचे किंवा रद्द करण्याचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांचेकडे राहतील. |
| १३. | उमेदवार सध्या अन्य संस्थेत कार्यरत असल्यास संबंधित संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र प्रत्यक्ष मुलाखतीच्या दिवशी तसेच उमेदवाराची निवड झाल्यास रुजु होते वेळी संबंधित संस्थेचे कार्यमुक्ती आदेश (Relieving Order) सादर करणे आवश्यक राहील. |

| | |
|---|---|
| १४ | उमेदवारास प्रथम नियुक्ती देण्यात आल्यानंतर किमान एक शैक्षणिक सत्र संपेपर्यंत त्यास कोणत्याही परिस्थितीत सेवा सोडता येणार नाही. तशा आशयाचे शपथपत्र तात्काळ सादर करणे आवश्यक राहील. तसेच शैक्षणिक सत्र चालु असलेल्या कालावधीत विदयार्थीहित विचारात घेता उमेदवाराचा राजीनामा कोणत्याही परिस्थितीत स्विकारला जाणार नाही. |
| १५ | नियमित नियुक्त आणि कार्यरत अध्यापकांप्रमाणेच पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील. तसेच त्यांचेप्रमाणेच कामाचे तास राहतील. |
| १६ | कंत्राटी पध्दतीने नियुक्ती अध्यापकांना सार्वजनिक सुटटी व रविवार याव्यतिरिक्त सेवा कालावधीत एका वर्षासाठी केवळ ०८ दिवस नैमत्तिक रजा अनुज्ञेय असतील. |
| १७ | कंत्राटी पध्दतीने नियक्त अध्यापकांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील. |
| १८ | करार पध्दतीने तात्पुरत्या कालावधीसाठी नियुक्त अध्यापक बिगर सेवानिवृत्त गटातुन कंत्राटी पध्दतीने नियुक्त होणाऱ्या अध्यापकांची नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्यांना पुर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ मिळणार नाहीत. |
| १९ | CME प्रशिक्षण/P.hD./ कार्यशाळा कालावधी कर्तव्य कालावधी धरण्यात येणार नाही. त्याकरिता नियमाप्रमाणे नैमित्तीक रजा भरुन द्यावी लागेल अथवा सदर CME प्रशिक्षण/P.hD./ कार्यशाळा दरम्यानच्या कालावधीचे वेतन कपात करण्यात येईल. |
| 20 | कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारास कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करण्यात येणार नाहीत. |
| 21 | उमेदवारानी मुलाखतीस येतांना आवश्यक ते सर्व संबंधीत मुळ कागदपत्रे व त्यांच्या सत्यप्रती सोबत आणाव्यात तसेच अनुभव प्रमाणपत्र, मुळ संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र आणणे अनिवार्य राहील. |

तरी इच्छुक व पात्र उमेदवारांनी www.mahaayush.gov.in तसेच www.ghmcjalgaon.in या वेबसाईट वर उपलब्ध करुन दिलेल्या विहीत नमुन्यातच अर्ज भरुन, आवश्यक प्रमाणपत्राच्या स्वयंसांक्षाकीत (Self Attested) प्रतीसह व मुळ प्रमाणपत्रासह अधिष्ठाता, शासकीय होमिओपॅथी महाविद्यालय, शासकीय महिला रुग्णालय इमारत,मोहाडी रोड, जळगाव-४२५००२ येथे दि.०८ मे २०२३ रोजी प्रत्यक्ष मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित राहावे.

सही/-

अधिष्ठाता,

शासकीय होमीओपॅथीक महाविद्यालय,

जळगांव

| पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवुन त्यावर स्वतः स्वाक्षरी करावी. |
|---|

अर्जाचा नमुना

**महाराष्ट्र शासन**
**शासकीय होमिओपॅथीक महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव**

प्रति,
अधिष्ठाता,
शासकीय होमिओपॅथीक महाविद्यालय व रुग्णालय,
जळगाव

विषय :- आपल्या महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक.................. या पदावर करार पध्दतीने ११ महिण्याच्या कालावधीकरीता नियुक्ती मिळणेबाबतचा अर्ज सादर करणेबाबत

संदर्भः- आपली जाहिरात दिनांक...............

महोदय,

उपरोक्त संदर्भित जाहिरातीस अनुसरुन मी आपल्या महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक.................. या पदावर करार पध्दतीने ११ महिण्याच्या कालावधीकरीता नियुक्ती मिळणेबाबतचा अर्ज सादर करीत आहे.

माझी संपुर्ण माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | संपुर्ण नांव | : | | | |
| | | | आडनाव | स्वतःचे नांव | वडीलांचे/ पतीचे नांव |
| २) | पत्रव्यवहाराचा पत्ता | : | | | |
| ३) | भ्रमणध्वनी क्रमांक : | : | | | |
| ४) | ई-मेल : | : | | | |
| ५) | जन्म दिनांक | : | | | |
| ६) | अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिनांकास वय | : | वर्ष | महीने | दिवस |
| | | | | | |
| ७) | राष्ट्रीयत्व | : | | | |
| ९) | **शैक्षणिक अर्हता : बीएचएमएस प्रथम वर्षापासुन सुरुवात करावी व सोबत सर्व वर्षाच्या सांक्षाकीत गुणपत्रीका जोडाव्यात :** | | | | |

| | अ.क्रं. | बोर्डाचे/विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण केलेल्या परीक्षा | उत्तीर्ण केल्याचे वर्ष | प्राप्त टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | १. | | | | |
| | २ | | | | |
| | ३. | | | | |
| | ४. | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १०) | अवगत असणा-या भाषा : (योग्य ठिकाणी (✓) अशी खुण करावी) | | | | |
| | मराठी | हिंदी | इंग्रजी | संस्कृत | अन्य |
| | | | | | |
| ११) | सध्या उमेदवार इतर संस्थेमध्ये कार्यरत आहे काय? | | होय / नाही | | |
| १२) | असल्यास संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र जोडले आहे काय? | | होय / नाही | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११) | कामाचा अनुभव : (प्रमाणपत्राच्या सांक्षाकीत प्रती जोडल्या असतील तरच ग्राहय धरला जाईल) | | | | |
| | **अ.क्रं.** | **संस्थेचे नांव** | **धारण केलेले पद** | **अनुभवाचा कालावधी (विदयापीठाची मान्यता असल्यास पत्र जाडावे)** | |
| | १. | | | | |
| | २. | | | | |
| | ३. | | | | |
| | ४. | | | | |
| १२) | प्रकाशित लेखांचा तपशिल (सोबत सांक्षाकित प्रती | | | | |
| १३) | प्रकाशित पुस्तकांचा तपशिल | | | | |
| १४) | पुरस्कार मिळाले असतील तर त्याचा तपशिल (सांक्षाकित प्रतीसह) | | | | |

| | | |
|---|---|---|
| १५) | अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांचा तपशिल : | |
| | १. | |
| | २. | |
| | ३. | |
| | ४. | |
| | ५. | |
| | ६. | |
| | ७. | |
| | ८. | |
| | ८. | |
| | ९. | |
| | १०. | |
| | ११. | |

| | | |
|---|---|---|
| | १२. | |
| | १३. | |
| | १४. | |
| | १५. | |

उमेदवाराची स्वाक्षरी

(संपुर्ण नांवासहीत)

अर्जासोबत जोडावयाच्या कागदपत्रांची यादी

| Sr.No. | Certificate/Document Name | जोडले आहे/नाही |
|---|---|---|
| 01 | SSC Passing Certificate (For D.O.B.)/T.C. (any one) | |
| 02 | Nationality/Domicile | |
| 03 | BHMS 1st Year to Final Year Marksheet | |
| 04 | BHMS passing Certificate | |
| 05 | Internship Completion Certificate | |
| 06 | BHMS Degree Certificate | |
| 07 | PG Degree Certificate/Passing Certificate (if applicable) | |
| 08 | Registration Certificate of State Council | |
| 09 | MS-CIT or Equivalent Qualification | |
| 10 | Experience Certificate | |
| 11 | No Objection Certificate from current institute | |
| 12 | Additional qualification in concern subject if any (Ph.D.) (if applicable) | |
| 13 | Research Paper publication in National or International Peer reviewed index journal | |
| 14 | Proof of Text Book / Ref. Book/chapter written in any other book approved by university | |
| 15 | Participation in National/International CME / Conference / Seminar etc. | |

# प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीमती/कुमारी ..................................................... प्रतिज्ञापुर्वक नमुद करतो/करते कि, वर नमुद केलेली माहीती पुर्णतः खरी असुन ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या ठिकाणी कोणत्याही टप्यावर किंवा नियुक्तीनंतर रद्द करण्यात येईल आणि माझेविरुध्द कायदेशीर कार्यवाही होईल, याची मला जाणीव आहे. तसेच सदरची नेमणुक निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची कंत्राटी पध्दतीवर असल्यामुळे नियमीत नियुक्तीसाठी मला हक्क सांगता येणार नाही आणि जाहीरातीत उल्लेखीत कारणास्तव नियमीत नियुक्तीचा उमेदवार/महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडुन/आस्थापना मंडळाकडुन/बदलीने उपलब्ध झाल्यास माझी तात्पुरती स्वरुपाची कंत्राटी नेमणुक आपोआप रद्द होईल, याची मला जाणीव आहे.

**ठिकाण :**

**दिनांक :** उमेदवाराची स्वाक्षरी

(संपुर्ण नांवासहीत)